लोकमत

# विद्यापीठाच्या १५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेच्या विविध अभ्यासक्रमांचे प्रथम आणि द्वितीय वर्षाचे निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया गुरुवारपासून सुरु झाली. या प्रक्रियेच्या पहिल्या दिवशी बी. ए., बी. कॉम, बी. एस्सी., आदी विविध १५ अभ्यासक्रमांचे निकाल ऑनलाईन जाहीर झाले. मागील सत्राच्या गुणांच्या सरासरीवर गुण देऊन निकाल जाहीर करण्यात आला आहे. निकाल जाहीर होत असल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. त्यासह द्वितीय आणि तृतीय वर्षाची प्रलंबित राहिलेल्या प्रवेश प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

शासनाच्या आदेशानुसार निकाल जाहीर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. विद्यापीठातील १७१ अभ्यासक्रमांचे निकाल पुढील १५ दिवसांत टप्प्या-टप्याने जाहीर केले जाणार आहेत. गुणपत्रिका या ऑनलाईन दिल्या जाणार आहेत असे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

Kolhapur Main
Page No. 8 Aug 21, 2020
Powered by: erelego.com

# शिवाजी विद्यापीठातर्फे रविवारी वेबिनार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची अकॅडमी फॉर अकॅडमिक अॅडमिनिस्ट्रेशन व श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २३) सकाळी ११ वाजता 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' या विषयावर राष्ट्रीय वेबिनार होणार आहे. पुण्याच्या भारती विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. माणिकराव साळुंखे हे प्रमुख उपस्थित असतील, तर शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर अध्यक्षस्थानी असतील. वेबिनारमध्ये नवी दिल्लीच्या निपा संस्थेच्या शैक्षणिक धोरण विभागाचे प्रमुख प्रा. अविनाश सिंग, एम-फुक्टोच्या तपती मुखोपाध्याय, मुंबईचे शिक्षणतज्ज्ञ आनंद मापुस्कर मार्गदर्शन करतील. समारोपास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित असतील.

# प्रथम, द्वितीय वर्षाचे निकाल जाहीर

## बी.ए., बी. कॉम, बी. एस्सीसह १५ अभ्यासक्रमांचे निकाल ऑनलाईन

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ प्रथम व द्वितीय वर्षाचे प्रलंबीत निकाल टप्प्याटप्प्याने जाहिर करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने बुधवारी घेतला होता. याबाबतचे आदेश प्रशासनाने संबंधीत महाविद्यालयांना दिले होते. यानुसार बी. ए., बी. कॉम, बी. एस्सीच्या विविध १५ अभ्यासक्रमांचे निकाल गुरुवारी ऑनलाईन पद्धतीने जाहिर करण्यात आले.

कोरोनामुळे देशभरात २२ मार्चपासून लॉकडाउन केले आहे. यानंतर राज्यातील विविध महाविद्यालये तसेच विद्यापीठ स्तरावरील परीक्षा रद्द करण्यात आल्या. परीक्षाच न झाल्याने विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत संभ्रम निर्माण झाला. तृतीय वर्षाच्या परीक्षेबाबत अजून कोणताच निर्णय झालेला नाही. त्यामुळे राज्य शासनाने प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांचे निकाल जाहिर करण्याचा सुचना विद्यापीठांना दिल्या आहेत. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना प्रथम सत्रात व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांच्या तृतीय सत्रात मिळालेल्या गुणांच्या आधारे निकाल जाहिर करण्यात येणार आहेत. प्रॅक्टीकलचेही गुणही महाविद्यालयांकडून देण्यात येणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात २९३ महाविद्यालये असून विद्यापीठात ३६ अधिविभाग आहेत. २०२० - २०२१ या वर्षासाठी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने माहिती भरावी असे आवाहन केले आहे.

**आय. टी. आयच्या प्रवेशाच्या मुदतवाढ**

दरम्यान आय. टी. आयच्या प्रवेशप्रक्रियेसाठी मुदतवाढ दिली आहे. आय. टी. आयच्या विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

### १५ दिवसांत सर्व निकाल लावणार

विद्यापीठातील प्रलंबीत प्रथम व द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमांचे निकाल टप्प्याटप्प्याने जाहिर करण्यात येणार आहेत. समितीने दिलेल्या सुचनांप्रमाणे निकाल जाहिर करण्याचे प्रक्रिया सुरु केली आहे. गुरुवारी १५ अभ्यासक्रमांचे निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहिर केले आहेत. येत्या १५ दिवसांत उर्वरीत अभ्यासक्रमांचे निकालही जाहिर करण्यात येणार आहेत.

**- डॉ. आर. व्ही. गुरव, प्रभारी संचालक,** परीक्षा विभाग



# विद्यापीठात रविवारी वेबिनार

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत होणार चर्चा**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची अॅकॅडमी फॉर अॅकॅडमिक एडमिनिस्ट्रेशन व श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी ११ वाजता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० या विषयावर वेबिनारचे आयोजन केले आहे.

पुणे भारती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. माणिकराव साळुंखे हे प्रमुख अतिथी असणार आहेत. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर अध्यक्षस्थानी असणार आहेत. वेबिनारमध्ये नवी दिल्लीच्या निपा संस्थेच्या शैक्षणिक धोरण विभागाचे प्रमुख प्रा. अविनाश सिंग, एम-फुक्टोच्या तपती मुखोपाध्याय, मुंबईचे शिक्षणतज्ज्ञ आनंद मापुस्कर मार्गदर्शन करणार आहेत. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित असतील, अशी माहिती डॉ. एस.टी. कोंबडे, अधिसभा सदस्य एम.एल. चौगुले यांनी दिली.

# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती प्रशिक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, पर्यावरणशास्त्र विभागाच्यावतीने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेचे ऑनलाइन स्वरुपात आयोजन केले आले होते. कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे आणि पर्यावरण संवर्धनासाठी पर्यावरण गणेशमूर्ती तयार करण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली आहे. या कार्यशाळेत श्रद्धा पोंबुर्लेकर यांनी सहभागी विद्यार्थ्यांना ट्री गणेशमुर्ती नारळापासून कशी तयार करायची यासंदर्भात प्रात्यक्षिके दाखवली. कार्यशाळेत शाडूची गणेशमूर्ती बनवून ती वाळवल्यानंतर त्यामध्ये फुलांच्या बिया खोवून मूर्तीची निर्मिती करण्यात आली. तसेच शहाळे आणि केळीचा बुंधा यापासून घरच्या घरी अगदी सोप्या पद्धतीने गणपती कसा बनवता येईल याचे प्रात्यक्षिक दाखविले. कार्यशाळेत १२५ जणांनी सहभाग नोंदवला. माजी विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी मार्गदर्शन केले. पर्यावरणशास्त्र विभागाच्या डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.